# BDC LIBRARY

## News Paper Clipping

## A.Y. 2025-26

# राजर्षी शाहू महाराज आजही जनतेच्या मनात-पाटील

पाटण : तत्कालीन कोलखंडात राजर्षी शाहू महाराजांनी केलेल्या सामाजिक सुधारणा तसेच शिक्षण, कला, क्रीडा, साहित्य, सांस्कृतिक अशा विविध क्षेत्रात केलेल्या कार्यामुळे ते आजही जनतेच्या मनात आहेत, असे प्रतिपादन बाळासाहेब देसाई कॉलेजचे ग्रंथपाल अनिल पाटील यांनी केले. येथील कोयना एज्युकेशन सोसायटीचे बाळासाहेब देसाई कॉलेज आणि सामाजिक शास्त्र मंडळ यांच्यावतीने आयोजित राजर्षी शाहू महाराज जयंती कार्यक्रमात ते बोलत होते. प्राचार्य डॉ. एस. डी. पवार, आयक्यूएसी समन्वयक डॉ. सौ. एच. व्ही काटे यांची प्रमुख उपस्थिती होती श्री. पाटील म्हणाले, राजर्षी शाहू महाराज यांनी समता, बंधुता, धर्मनिरपेक्षता सर्व घटकांना विकासाची समान संधी ही तत्वे करवीर संस्थानात अमलात आणली.रयत, प्रजा व उपेक्षित समाजाला त्यांचे हक्क व न्याय मिळवून देण्याचे कार्य शाहू महाराजांनी केले.

प्राचार्य डॉ. एस. डी. पवार म्हणाले, शाहू महाराजांनी आपल्या जीवनकार्यामध्ये बहुजन समाजाला त्यांचे न्याय व हक्क मिळवून देण्यासाठी आपल्या अधिकाराचा पूर्णपणे वापर केला. म्हणून ते लोककल्याणकारी राज्यकर्ते ठरले. प्रा. बी. ए. चव्हाण यांनी प्रास्ताविक केले. प्रा. तुषार महाले यांनी आभार मानले. प्रा. एल. जी. गणगे यांनी सूत्रसंचालन केले.